**बातमी प्रसिध्दीसाठी**

महाराष्ट्रातील चारही कृषि विद्यापीठांमध्ये उपलब्ध असणा-या विविध विद्या शाखांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ साठी पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सामाईक प्रवेश परीक्षा - २०२१ महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांचे मार्फत आयोजित करण्यात आली आहे. सदर परीक्षेसाठी संबंधीत विद्याशाखेचे पदवीधर आणि सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षाच्या अंतिम पदवी परीक्षेस बसणारे विद्यार्थी पात्र राहतील. ऑनलाईन (Online) अर्ज भरण्याची तारीख २०.०५.२०२१ ते १५.०६.२०२१ अशी राहील. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर डेबिट /क्रेडीट कार्डव्दारे किंवा जनरेट होणा-या चलनाव्दारे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या स्थानिक शाखेत परीक्षा शुल्क दि.२०.०५.२०२१ ते दि.२०.०६.२०२१ तारखेपर्यंत स्वीकारली जाईल. ही परीक्षा दिनांक ०८ ऑगस्ट, २०२१ ते ११ ऑगस्ट, २०२१ या कालावधीत महाराष्ट्रातील वीस केंद्रांवर आयोजित करण्यात येत आहे. सदर परीक्षेसाठी विहित नमुन्यातील अर्ज महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे http://www.mcaer.org या संकेतस्थळावर स्वतः भरावयाचे आहे. अर्ज भरण्यापूर्वी संपूर्ण माहितीपत्रक वाचणे गरजेचे आहे. संबंधित अर्ज महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांच्याकडे पाठविण्याची आवश्यकता नाही. अंतिम पात्र व अपात्र उमेदवारांची यादी दिनांक ०२.०७.२०२१ रोजी संकेतस्थळावर उपलब्ध होईल. पात्र उमेदवारांनी आपले परीक्षा प्रवेश पत्र वरील संकेतस्थळावरुन दि.२०.०७.२०२१ पासून स्वतः प्रिंट काढून उपलब्ध करुन घ्यावयाचे आहेत.

उत्तराची नमुना पत्रिका दि.२५.०८.२०२१ व परीक्षेचा निकाल दि.३०.०८.२०२१ रोजी महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे http://www.mcaer.org या संकेतस्थळावर पाहण्यास उपलब्ध राहील. या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२०-२५५२८११९ / ०२०-२५५२८५१९ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा असे डॉ. एस.एल.बडगुजर, नियंत्रक, महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांनी कळविले आहे.

नियंत्रक

महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे

दिनांक : १९.०५.२०२१

स्थळ : पुणे